दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक २४५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • सोमवार दि.५ डिसेंबर २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# राज्यपालांची हकालपट्टी होत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरुच ठेवणार : संभाजीराजे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान, महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमावाद यांसह अनेकविध मुद्द्यांवरून राज्यातील राजकीय वातावरण तापल्याचे पाहायला मिळत आहे. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या विधानाचे पडसाद अद्यापही उमटत आहेत. महाविकास आघाडीसह अन्य नेतेही राज्यपाल हटाव या भूमिकेवर ठाम असल्याचे दिसत आहेत. यातच संभाजीराजे यांनी पुन्हा एकदा या प्रकरणी स्पष्ट भूमिका मांडली असून, थेट इशारा दिला आहे.**

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांना महाराष्ट्रातून बाहेर काढा अशी भूमिका सर्वांत अगोदर मी घेतली आहे. आम्ही वेळोवेळी स्वराज्य संघटनेच्या माध्यमातून आंदोलन केलेले आहे. ३० जिल्ह्यांत आम्ही आंदोलन केले आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना कोश्यारींना हटवण्याचे निवेदन दिले आहे. जेव्हा कोश्यारी पुण्यात आले, तेव्हा त्यांना काळे झेंडे स्वराज्य संघटनेच्या कार्यकर्त्यांनीच दाखवलेले आहेत. जोपर्यंत कोश्यारी यांना महाराष्ट्रातून बाहेर काढले जात नाही, तोपर्यंत आम्ही हे आंदोलन सुरुच ठेवू. भगतसिंह कोश्यारी यांच्या राज्यपालपदावरून हकालपट्टी होत नाही, तोपर्यंत आम्ही शांत बसणार नाही, असा थेट इशारा संभाजीराजेंनी दिला आहे.

**दरम्यान, राज्यपाल वेळोवेळी अपशब्द काढतात. यावर भाजपचे सरकार कशे शांत राहू शकते. कोश्यारी यांना महाराष्ट्रातून काढल्यानंतरच भाजपचे छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावरील प्रेम निश्चित होणार आहे. राज्यपालांविषयी उदयनराजे भोसले यांनी घेतलेली भूमिका योग्य आहे. उदयनराजे आणि संभाजीराजे वेगळे नाहीत. आम्ही आंदोलनं वेगळ्या पद्धतीने करत आहोत. मात्र आम्ही दोघे एकच आहोत, असे संभाजीराजे म्हणाले.**



## भाजपची दुटप्पी भूमिका, ते रस्त्यावर का उतरत नाहीत?

भाजप एकीकडे शिवाजी महाराज आमची अस्मिता आहे, असे म्हणतो. आम्ही राजकारण आणि समाजकारण शिवाजी महाराजांचे नाव घेऊनच करतो, असा दावा भाजप करतो. मग राज्यपाल भगतसिंह कोश्यारी अद्याप महाराष्ट्रात कसे आहेत. भाजपची ही दुटप्पी भूमिका आहे. भाजप रस्त्यावर का उतरत नाही, अशी विचारणा करत, राज्यपालांनी जे विधान केले आहे, त्याची सर्व माहिती आम्ही योग्य ठिकाणी पोहोचवली, असे देवेंद्र फडणवीस सांगतात. हे काय उत्तर आहे का. त्यांची काही जबाबदारी नाही का? सरकारमध्ये असले म्हणजे बोलायचे नाही का? कोश्यारी यांचा राजीनामा घेतला पाहिजे, अशी मागणी संभाजीराजेंनी केली आहे.

# आ. राजन साळवी यांची आज अलिबागमध्ये झाडाझडती

**दै.रायगड नगरी । अलिबाग**



शिवसेना ठाकरे गटाचे राजापूरचे आ.राजन साळवी यांची सोमवारी (दि.५) अलिबाग येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागमार्फत चौकशी केली जाणार आहे. त्यामुळे राजकीय वातावरण तापणार आहे.

राज्यात सत्तांतर झाल्यापासून ठाकरे गटाला विविध प्रकरणामध्ये अडकविण्याचा खटाटोप सत्ताधारी शिंदे, फडणवीस सरकारने सुरु केलेला आहे. यापूर्वी अ‍ॅड. अनिल परब, वैभव नाईक यांनाही अशाच चौकशांना सामोरे जावे लागले आहे. आता राजन साळवी यांना अलिबाग येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयात चौकशीसाठी हजर राहण्याचे समन्स बजावण्यात आलेले आहे.

साळवी यांच्या मालमत्तेसंदर्भात चौकशीसाठी ही नोटीस बजावण्यात आली आहे. या चौकशीतून नेमके काय साध्य होणार आहे हे चौकशी अंती समजणार आहे. दरम्यान, या पार्श्वभूमीवर अलिबाग पोलिसांच्यावतीने शहरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. सोमवारी साळवी दाखल झाल्यावर शिवसेना ठाकरे गटाकडून जोरदार शक्तीप्रदर्शन केले जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

# ठाकरे गटाला पनवेलमध्ये धक्का ; रमेश गुडेकर बाळासाहेबांच्या शिवसेनेत



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिंदे गटाचे महानगरप्रमुख माजी नगरसेवक ड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण यांच्या शिष्टाईने अखेर गुडेकर यांनी उद्धव ठाकरे यांना जय महाराष्ट्र करत एकनाथ शिंदे यांना जाहीर समर्थन दिले आहे.

अर्बन बँक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीत उमेदवारी निश्चित करण्यावरून रमेश गुडेकर व शिवसेना पक्षातील वरिष्ठ नेत्यांचे वाद झाल्याचे समजते. याबाबत एक जाहीर पत्रक काढून गुडेकर यांनी स्पष्ट नाराजी व्यक्त केली होती. जिल्हा सल्लागार पदावर असूनही जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांनी त्यांची हकालपट्टी केली. या परिस्थितीचा फायदा घेत महानगरप्रमुख प्रथमेश सोमण यांनी लागलीच रमेश गुडेकर यांची भेट घेऊन एकनाथ शिंदे यांच्या बाळासाहेबांची शिवसेनेत प्रवेश करण्याबाबत दिल जमाई केली.

.../२

# उद्धव ठाकरे प्रकाश आंबेडकरांची पुन्हा भेट होणार

## राज्याच्या राजकारणात नव्या समीकरणाची नांदी?

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अध्यक्ष माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांची उद्या दुपारी १२ वाजता बैठक होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. आगामी मुंबई महापालिका आणि स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दोन्ही नेत्यांची भेट महत्त्वाची मानली जात आहे. उद्याच्या बैठकीत उद्धव ठाकरे आणि प्रकाश आंबेडकर यांच्यात आघाडीसंदर्भात प्राथमिक चर्चा होईल, अशी माहिती आहे.

### ठाकरे आंबेडकर भेटीत नवं समीकरण निर्माण होणार?

उद्धव ठाकरे आणि प्रकाश आंबेडकर उद्या मुंबईत एकत्र येणार आहेत. या भेटीत दोन्ही पक्षाच्या आघाडीसंदर्भातील चर्चा होण्याची शक्यता आहे. या बैठकीला सेनेचे ज्येष्ठ नेते सुभाष देसाई उपस्थित राहणार असल्याची माहिती आहे. ठाकरे आणि आंबेडकर यांचं एकमत झाल्यास आगामी स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीपूर्वी राज्याच्या राजकीय वर्तुळात नव्या समीकरणाचा उदय होईल.



उद्धव ठाकरे आणि प्रकाश आंबेडकर प्रबोधनकार. डॉट. कॉम या वेबसाईटच्या रीलाँचिंगच्या निमित्तानं एकत्र आले होते. उद्धव ठाकरेंनी देशातील सध्याच्या राजकीय स्थितीचा दाखला देत लोकशाही वाचवण्यासाठी आपण एकत्र यायला हवं, असं म्हणत वंचित सोबत आघाडीसाठी सकारात्मक असल्याचे संकेत दिले होते. यानंतर वंचितच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांनी वंचित बहुजन आघाडी शिवसेनेसोबत आघाडीसाठी तयार असल्याचं म्हटलं होतं. मात्र, वंचितनं महाविकास आघाडीतील काँग्रेस आणि राष्ट्रवादीसंदर्भात प्रश्न उपस्थित केले होते.

उद्धव ठाकरे आणि प्रकाश आंबेडकर यांच्या भेटीत सकारात्मक निर्णय झाल्या. राज्यात मोठ्या घडामोडी घडण्याची शक्यता आहे. शिवसेना ठाकरे गट आणि वंचित बहुजन आघाडी एकत्र आल्यास शिंदे फडणीवस यांची चिंता वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मात्र, शिवसेना ठाकरे गट वंचित सोबत राजकीय आघाडी करताना महाविकास आघाडीतील मित्र पक्ष काँग्रेस आणि राष्ट्रवादीसंदर्भात उद्धव ठाकरे काय भूमिका घेणार हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे.

वंचित बहुजन आघाडीनं गेल्या लोकसभा निवडणुकीत ४२ लाखं मतं मिळवली होती. २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीत वंचितचे उमेदवार दुसऱ्या स्थानी होते. त्यामुळं वंचितचा जसा शिवसेना ठाकरे गटाला फायदा होऊ शकतो. त्याच प्रमाणं शिवसेनेच्या मतांचा देखील वंचितला फायदा होऊ शकतो. मात्र, उद्या होणाऱ्या बैठकीत काय घडणार यावर दोन्ही राजकीय पक्ष पुढील वाटचाल सोबत करणार का हे स्पष्ट होईल. वंचितसोबत आघाडीचा फायदा ठाकरेंना मुंबई महापालिका निवडणुकीत देखील होऊ शकतो, असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

# सुरेश कालगुडे खून प्रकरणी आरोपीला जन्मठेप

**दै.रायगड नगरी । महाड**

महाड तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्य सुरेश कालगुडे खून प्रकरणातील आरोपीला माणगांव येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

३१ डिसेंबर २०१८ च्या मध्यरात्री एम.एच .०४६ बी बी ५४८२ या कंटेनरचा चालक शिवपती सुभोगलाल पटेल याते दारुच्या नशेत सुरेश कालगुडे यांच्या अंगावर कंटेनर घालून त्यांना जीवे ठार मारले होते. तत्पुर्वी या प्रकरणातील फिर्यादी भारत मोहन कदम याच्या अंगावर कंटेनर घालून त्यालाही जीवे ठार मारण्याचा प्रयत्न त्याने केला होता. महाड औद्योगिक वसाहतीमधील झुआरी केमिकल्स कारखान्याच्या आवारात ही घटना घडली होती. घटनेनंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला होता.

महाड एमआयडीसीचे तत्कालीन पोलीस निरिक्षक आबासाहेब पाटील यानी तात्काळ त्याचा शोध घेवून लपलेल्या ठिकाणावरुन त्याला ताब्यात घेतले आणि रितसर गुन्हा दाखल करुन तपासांती प्रकरण न्यायप्रविष्ट केले. माणगाव अतिरिक्त सत्र न्यायालयात या प्रकरणाची सुनावणी सुरु होती. अतिरिक्त सहाय्यक सरकारी वकील जितेंद्र म्हात्रे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे दाखले देत आरोपीविरुद्धचा गुन्हा शाबित केला.

.../२

# आरोग्य केंद्रावर दररोज संपूर्ण वेळ गोवर प्रतिबंधक लस उपलब्ध करा : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्यात गोवरच्या ७४५ रुग्णांची नोंद झालेली आहे, १२ हजार पेक्षा जास्त संशयित रुग्ण आहेत. गोवरमुळे १८ मुलांचा मृत्यू झालेला आहे. अशा परिस्थितीत पनवेल महानगरपालिकेच्या मार्फत राबवण्यात आलेल्या उपाययोजना या अजून प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रितम म्हात्रे यांनी काही सूचना केल्या. सध्याच्या परिस्थितीमध्ये आरोग्य केंद्रावर फक्त बुधवारी सकाळी साडेनऊ ते एक वाजेपर्यंत आठवड्यातून एकच दिवस लस उपलब्ध असते, त्यामुळे तिथे आलेल्या नागरीकांना माघारी परत जावे लागते. त्यामुळे आरोग्य केंद्रावर दररोज संपूर्ण वेळ गोवर प्रतिबंधक लस उपलब्ध करा अशी मागणी मा. विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी केली आहे.



पनवेल महानगरपालिकेमार्फत काही उपाययोजना करताना मा.प्रितम म्हात्रे यांनी सुचविले की, महानगरपालिकेच्या सर्व आरोग्य केंद्रावर दररोज आणि संपूर्ण वेळ गोवर प्रतिबंधक लस उप–लब्ध कराव्यात. बालकांची जन्म नोंद प्रमाणे पाच वर्षात जेवढे जन्म नोंद झालेले आहे त्या सर्वांना होम व्हिजिट करून प्रकृतीची विचारपूस करणे. त्यापैकी कोणी डोस घेतले आहेत का ते चेक करून नसेल घेतलं तर देणे. ग्रामीण भागात, आदिवासी विभागात, तसेच बैठी घरांमध्ये जनजागृती मोहीम राबवणे आवश्यक आहे. पालकांमध्ये या विषयात माहिती मिळण्यासाठी महानगरपालिकेच्या क्षेत्रामधील सर्व शाळांमध्ये या आजारासंदर्भात जनजागृतीचे बॅनर लावणेसाठी शाळांना कंपल्सरी सांगणे. गोवरचे रुग्ण आढळलेल्या परिसरामध्ये लसीकरणाचे कॅम्प राबवणे. आदरणीय नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयामध्ये संपूर्ण दिवस लस उपलब्ध राहील अशा प्रकारची व्यवस्था करणे जेणेकरून कामावर जाणाऱ्या पालकांना सोयीचे पडेल.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील लहान मुलांच्या डॉक्टरांची एक दक्षता कमिटी नेमून भविष्यात सदर आजाराचे रुग्ण शून्य राहतील यासाठी पनवेल महानगरपालिकेने पुढाकार घ्यावा.

**प्रितम म्हात्रे (मा. विरोधी पक्षनेते, प.म.पा.)**

# महापालिकेच्यावतीने पनवेलमध्ये नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबीर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका अंतर्गत जागतिक अपंग सहाय्यता दिनाच्या निमित्ताने नुकतेच(३ डिसेंबर, शनिवार ) पनवेलमध्ये आंबेडकर भवन येथे नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले. आयुक्त श्री.गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या आरोग्य शिबीराचा १७६ नागरिकांनी लाभ घेतला.



नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र गावदेवी पनवेल यांच्या अंतर्गत झालेल्या आरोग्य शिबीरामध्ये मोफत रक्त तपासणी, बाल रोग तपासणी, डोळे तपासणी, त्वच–ारोग तपासणी, कान नाक घसा तपासणी, अस्थिरोग तपासणी व इतर सर्व सुविधा नागरिकांना देण्यात आल्या. तसेच गोवर व रुबेला संशयित रुग्णांसाठी लसीकरणाचे विशेष सत्र आयोजित करून जनजागृती मोहिम राबविण्यात आली.

प्रभारी मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, डॉ.अनमोल ठाकूर,तसेच तेरणा मेडिकल वैद्यकिय महाविद्यालयाच्या डॉक्टरांच्या सहकार्यातून हे शिबीर घेण्यात आले.

# २३ डिसेंबरपर्यंत टेंडर निघालं नाही तर सांगलीतील ४२ गावं कर्नाटकात जाणार

**सांगली । वृत्तसंस्था**

महाराष्ट्र सरकारने सांगलीच्या जत तालुक्यातील ४२ गावांना पाणी देण्यासाठी म्हैसाळ विस्तारीत योजनेचे टेंडर २० जानेवारी ऐवजी २३ डिसेंबरच्या आत काढावे. अन्यथा २४ डिसेंबर रोजी ४२ गावांमधील दुष्काळग्रस्तांची व्यापक बैठक घेऊन पुढच्या आंदोलनाची भूमिका घेऊन कर्नाटक मध्ये जाण्याचा निर्णय घेतला जाईल,असा इशारा पाणी संघर्ष कृती समितीच्या पार पडलेल्या बंद खोलीतल्या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे.

तसेच ४२ गावांना पाणी देण्यासाठी टेंडर काढायच्या सरकारच्या भूमिकेला कोणाचा विरोध नसेल,तर येत्या आठवड्यात पार पडणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये तात्काळ टेंडर काढण्याचं जाहीर करावे. जेणेकरून कोणत्या पक्षाचे पाणी देण्यासाठी विरोध आहे, हेदेखील आम्हाला समजेल. विरोध नसेल तर मग टेंडर काढायला अडचण नाही. त्यामुळे आता महाराष्ट्र सरकारने २३ तारखेपर्यंत टेंडर काढावे. अन्यथा आता २४ डिसेंबरला कर्नाटकमध्ये सामील होण्याबाबत पुढचा निर्णय आम्ही घेऊ,असा थेट इशारा पाणी संघर्ष कृती समितीकडून देण्यात आला आहे. त्यामुळे आता शिंदे–फडणवीस सरकार काय पावलं उचलणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

# रात्रीच उभारलेल्या झोपड्या रात्रीच जमीनदोस्त

## कळंबोली अतिक्रमण विभागाची धडक कारवाई



**दै.रायगड नगरी । कळंबोली**

कळंबोली वसाहतीमध्ये महापालिकेच्या मोकळ्या जागांवर झोपड्या उभारून तेथे बेकायदा नागरी वस्ती अथवा टपऱ्या दुकाने उभारण्याचे काम राजरसपणे केले जात आहे. मात्र याबाबत आता नागरिकही सजग झाले असून याची माहिती त्वरित महापालिकेच्या अतिक्रमण विभागाला दिली जात आहे .

दोन दिवसापूर्वी रोडपाली जवळील मोकळ्या जागेवर बांबूच्या झोपड्या रात्री उभारल्या होत्या .याबाबत अतिक्रमण विभागाला माहिती देतात कळंबोली अतिक्रमण विभागाचे प्रमुख सदाशिव कवठे यांनी रातोरात उभारलेल्या झोपड्यावर रातोरात धडक कारवाई करून जमीनदोस्त केल्याने त्यांच्या कौतुकाचा वर्षाव होत आहे.

कळंबोली वसाहतीमध्ये विविध ठिकाणी महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण

.../२

# माथेरान न.प.च्या संभाव्य निवडणुकीतील युत्या आघाड्या दिखावाच ठरणार ? कार्यकर्ते अनभिज्ञ

**दै.रायगड नगरी । माथेरान**

सत्तेच्या सारीपाटासाठी इथली राजकीय पक्षांची मंडळी वेळप्रसंगी कुणाच्याही आधारावर नगरपरिषदेच्या सभागृहात जाण्यासाठी आग्रही दिसत आहेत. मागील २०१६ च्या निवडणुकी मध्ये शिवसेनेची स्वबळावर एकहाती सत्ता स्थापन झाली होती. सतरा पैकी चौदा जागांवर त्यांनी निर्विवाद बहुमत प्राप्त केले होते.एका जागेवर काँग्रेस पक्षाला समाधान मानावे लागले होते तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदरात दोन जागा मिळाल्या होत्या. त्या पाच वर्षात केवळ काँग्रेस पक्षाने सत्ताधारी शिवसेनेला पाठबळ दिले नव्हते.काँग्रेसचा एकच नगरसेवक पाच वर्षे विरोधात राहिला होता.परंतु राष्ट्रवादी काँग्रेसचे दोनही सदस्य शिवसेनेच्या गोटात अप्रत्यक्षपणे सहभागी झाले होते. सत्ताधारी शिवसेनेने आपल्या परीने मागील जुन्या निधीच्या जोरावर काही कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले.होणाऱ्या काही ठराविक निकृष्ट कामांना ठाम विरोधात जाण्यासाठी कुणीही प्रयत्न केले नाहीत तात्पुरता विरोध झाला होता परंतु सत्तेच्या पुढे शहाणपण चालत नाही त्यामुळे जवळपास निम्म्याहून अधिक कामांची बिले ठेकेदारांना अदा करण्यात आली होती.

२०१६ च्या निवडणुकीत ज्यांनी एकमेकांच्या विरोधात रणशिंग फुंकले होते. त्या मंडळींना सुरुवातीपासून आर्थिक बाबीची पूर्तता करण्यात आल्याने सत्ताधारी सेनेला काँग्रेस वगळता कुणीच विरोधक राहिला नव्हता. एकमेकांना पाण्यात पाहणारे हे राजकारणी कधी एकत्र झाले हे त्यांच्या कार्यकर्त्यांना सुध्दा माहीत नव्हते. काही राजकीय नेत्यांनी मागील काळात इथल्या बंगल्याचे आपल्या पोटासाठी खरेदीविक्री व्यवहार सुरू केले होते.त्यात ही विरोधक मंडळीनी गळ्यातगळा घालून वैयक्तिक कामे पूर्ण केली आहेत. नेत्यांनी फक्त एकमेकांचे हीत जोपासण्यात धन्यता मानली होती. पाच वर्षे कार्यकर्त्यांना एकप्रकारे दुय्यम स्थान देण्यात आले होते. यापुढेही येणाऱ्या नगरपरिषदेच्या निवडणुकी मध्ये होणाऱ्या युत्या आघाड्या ह्या केवळ दिखाव्यापुरता असणार आहेत. ठराविक मंडळीनी सभागृहात जाऊन नेहमीप्रमाणे आपले, कुटुंबाचे आणि जवळच्या नातेवाईकांचे हीत करून कार्यकर्त्यांचा सर्वच पक्ष वापर करून घेणार असल्याचे स्पष्ट चित्र सध्यातरी दिसत आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी कुणासोबत राहावे हा प्रश्न उपस्थित होणार आहे. ज्यांचा गावच्या सर्वांगीण विकासासाठी विरोध आहे अशा राजकीय पक्षांच्या उमेदवारांना मतदारांनी जागा दाखवून देण्याची वेळ लवकरच येणार आहे. ज्यांचा या गावाशी काडीचाही संबंध नाही, इथे फक्त व्यवसाय करून, पर्यटकांची दिशाभूल करून माथेरानची प्रतिमा मलिन करण्याचा कुटील प्रयत्न करत आहेत अशाच मतदारांना केवळ सत्तेसाठी राजकारणी पक्षांकडून गोंजारले जात आहे.सहसा कुणीही राजकारणी विकासाला विरोध करणाऱ्या लोकांच्या विरोधात केवळ मतांसाठी भ्र शब्द काढत नाहीत.

आगामी काळात विकास कामांसाठी येणाऱ्या भरीव निधीवर डोळा ठेऊन सत्तेसाठी कुणाच्याही सोबत युती आघाडी करण्याची तयारी सध्या सुरू असल्याचे दिसून येत आहे.अनेक प्रकल्प माथेरान साठी प्रलंबित आहेत परंतु सत्तेशिवाय कामेच करायची नाही अशी स्वतःला अभ्यासू ,हुशार समजणाऱ्या नेत्यांची मानसिकता झाल्याने आगामी निवडणुकीत सत्तेत विराजमान होऊन प्रलंबित कामे पूर्ण करणार अशीही राजकीय मंडळी प्रामुख्याने इथेच पहावयास मिळते.

मतदारांनी निवडुन दिलेले बहुतेक लोकप्रतिनिधी मागील दोन वर्षांपूर्वी आर्थिक लाभासाठी अन्य पक्षात गेले होते त्यातील काही जण पुन्हा स्वगृही परतले. काही कुटुंबातील सदस्यांनी पक्ष वाटून घेतले आहेत. त्यामुळे कुणाचीही सत्ता स्थापन झाली तरी आर्थिक लाभ त्या त्या महत्वकांक्षा बाळगणाऱ्या मंडळींनानेहमीप्रमाणे आपसूकच होणार आहे. निष्ठावंत कार्यकर्ता नेहमीप्रमाणे ओल्या सुक्या पार्ट्यांमध्ये सामील होऊन आपल्या नेत्यांसाठी छाती बडवणार आहे. माथेरान हे छोटेसे गाव असल्याने साहजिकच निवडणुका झाल्यावर सर्वजण सुखदुःखात एकत्रित येतात.सत्ता कुणाचीही येवो निष्ठावंत कार्यकर्त्यांना दुय्यम स्थान देऊन जे विरोधात होते त्यांची कामे मोठया लगबगीने पूर्ण केली जातात हे आजवर सर्वच कार्यकर्त्यांना ज्ञात आहे त्यामुळे आगामी काळात कुणाचा झेंडा हाती घ्यायचा हे कार्यकर्त्यांवर अवलंबून आहे.

# राज्य वस्तू व सेवा कर विभागातील अधिकाऱ्यांचे ठिय्या आंदोलन




**दै.रायगड नगरी । कळंबोली**

जीएसटी च्या पार्श्वभूमीवर चार वर्षांपूर्वीच सादर झालेल्या पुनर्रचना समितीच्या अहवालाची अंमलबजावणी तातडीने करावी, दोन दशकांपासून प्रलंबित राज्यकर अधिकारी वेतनत्रुटि दूर व्हावी, तसेच अधिकारी कर्मचाऱ्यांच्या इतर महत्त्वाच्या शासन प्रशासनाचे दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे राज्यकर विभागात कमालीचा असंतोष पसरली आहे.

शासन– प्रशासनाचे या प्रलंबित मागण्यांकडे लक्ष्य वेधण्यासाठी राजपत्रित अधिकारी संघटना राज्यभरातील कार्यालयासमोर काळ्या फिती आणि निदर्शनासह ठिय्या आंदोलन करीत आहेत.

आंदोलनाच्या पहिल्या दिवशी राज्यभरातील सर्व जीएसटी कार्यालयासमोर, तसेच कोकण भवन, रायगड विभाग बेलापूर येथिल कर्यालासमोर मोठ्या संख्येने उपस्थित राहून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी एकत्रितपणे शासन– प्रशासनाच्या विरोधात जोरदार निदर्शने केली. कर्मचारी, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या संघटना प्रतिनिधींनी उपास्थित राहून पाठिंबा दर्शविला.

यावेळी निदर्शनासह ठीय्या आंदोलन अधिक तीव्रतेने करण्यात येईल, असा निर्धार संघटनेचे प्रतिनिधी कमलेश नागरे, विलास कडाळे , सुबोध लवटे, दिगंबर माळी, आश्विनी धुमाळ यांनी व्यक्त केला आहे.

त्यानंतर देखील शासन प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास विभागातील सर्व संघटनांनी एकत्र येऊन कामबंद अथवा बेमुदत संप करावा, असा इशारा विभागातील अधिकारी कर्मचाऱ्यांचा संघटनांनी यावेळी दिला.

# इको गाडीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रजीउद्दीन मसुद्दीन खान (वय ३९) यांनी त्यांची ग्रे रंगाची साठ हजार रुपये किमतीची एम. एच.४८ बी एच २३७७ हि गाडी भिंगारी येथील एम.एस. ई. बी ऑफीस च्या पाठीमागे उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेली.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, श्री.कल्पेश बाळाराम मुंडकर रा.मु.पो.वाघिवली, ता.पनवेल, जि.रायगड (यास यापुढे ''मुळमालक'' असा उल्लेख केलेला आहे.) यांची खालील वर्णनाची जमीन नवी मुंबई विमानतळ प्रकल्पासाठी संपादीत झालेली आहे. सदर संपादनापोटी मुळ मालक यांना खालील वर्णनाचा भूखंड पुर्नवसन योजनेंतर्गत मिळालेला आहे. सदर भूखंडासंदर्भात मुळ मालक श्री.कल्पेश बाळाराम मुंडकर यांनी मे.तनु डेव्हलपर्स तर्फे सौ.माया सावंत यांना खालील वर्णनाचा भूखंड कायमस्वरुपी मे.सिडको लि. यांचे बरोबर त्रिपक्षीय कराराद्वारे हस्तांतरण करण्याचे ठरविले होते आणि त्या अनुषंगाने दि.३०/०७/२०२० रोजीच्या नोंदणीकृत असाईमेंट डीडद्वारे मालकी हक्क प्रदान केले होते आणि कधीही रद्द न होणारा कुलमुखत्यारपत्र देखील सोबतच नोंदणीकृत करून दिलेले. नंतर मुळ मालक श्री.कल्पेश बाळाराम मुंडकर यांनी दि.३०/०९/२०२१ रोजी स्वतः मे.तनु डेव्हलपर्स तर्फे सौ.माया सावंत यांचे नावे सदरचा भूखंड सिडको दप्तरी त्रिपक्षीय कराराद्वारे हस्तांतरीत करून दिला आणि सदरचे त्रिपक्षीय करार सह निबंधक कार्यालयात नोंदणीकृत करून दिला. तसेच मुळ मालक यांनी त्यांचे काका श्री.कमलाकर तुकाराम मुंडकर यांना कुलमुखत्यारपत्र दिलेले होते याची माहिती में.तनु डेव्हलपर्स तर्फे सौ.माया सावंत यांना नव्हती. सदर श्री.कमलाकर तुकाराम मुंडकर यांनी सदर कुलमुखत्यार पत्राच्या आधारे सदर भूखंडाचा में.तनु डेव्हलपर्स तर्फे सौ.माया सावंत यांच्या बरोबर लबाडीने विकसनाचा करार त्याच दिवशी म्हणजे दि.३०/०९/२०२१ रोजी केला होता व आहे. सदरच्या विकसन करार दि.३०/०९/२०२१ रोजीच्या कराराचे कायदेशीररित्या कोणतेही अस्तित्व नाही कारण सदरचे भूखंड मुळ मालक यांनी में.तनु डेव्हलपर्स तर्फे सौ.माया सावंत यांचे नावे कायमस्वरुपी ह्या तत्वाने हस्तांतरीत केलेला आहे व तसेच आज रोजी सदर भूखंडाचे मालक म्हणून सिडको दप्तरी में.तनु डेव्हलपर्स तर्फे सौ.माया सावंत यांची नोंद आहे. त्यामुळे मे.तनु डेव्हलपर्स तर्फे सौ.माया सावंत यांनी श्री.कल्पेश बाळाराम मुंडकर यांचे कुलमुखत्यारी श्री.कमलाकर तुकाराम मुंडकर यांनी करून दिलेला दि.३०/०९/२०२१ रोजीचा विकसनाचा करार रद्द करीत आहेत.

**संपादीत घर मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वाघिवली, ता.पनवेल, जि.रायगड**

| सांकेतिक क्रमांक | बांधकाम धारकाचे नाव व क्रमांक | क्षेत्र चौ.मी. | बांधकाम क्रमांक |
|---|---|---|---|
| WAG-ICIG-99 | कल्पेश बाळाराम मुंडकर | ८१.२० | WG-133 |

**भूखंड**

| नोड | भूखंड | सेक्टर | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक वहाळ (उलवे) | २९० | २६ | ३०० |

सबब सदरहू भूखंडासंदर्भात दि.३०/०९/२०२१ रोजीचा नोंदणीकृत विकसन करार दस्त क्र.प व ल–३–१५३३९/२०२१ विकसन करार रद्द करणे कामी यावा त्यासंदर्भात में.तनु डेव्हलपर्स तर्फे सौ.माया सावंत हे योग्य ती कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करणार आहेत. तसेच में.तनु डेव्हलपर्स तर्फे सौ.माया सावंत हे नवीन मालक असल्या कारणाने सदर भूखंड कोणीही खरेदी करू नये किंवा श्री.कल्पेश बाळाराम मुंडकर यांचे कुलमुखत्यारी श्री.कमलाकर तुकाराम मुंडकर यांचेशी सदरच्या भूखंडाच्या विकसना संबंधी अथवा खरेदी–विक्री संबंधी कोणताही व्यवहार करू नये. तथा या संबंधात कोणाही व्यक्तीस काही म्हणणे असेल तर त्वरित संपर्क साधावा.

दि.०४/१२/२०२२
ठिकाण : वाशी, नवी मुंबई

**सही/–**
**मितुल चं. लव्हेकर**
**वकील, उच्च न्यायालय**
**ऑफिस–३८, तळमजला अरेंजा कॉर्नर, सेक्टर–१७, वाशी, नवी मुंबई**
**मो.९९६७५५१३४४**


# ओवेन्स कॉर्निंग कंपनीतर्फे आयोजित सामाजिक उपक्रम

**दै.रायगड नगरी । पनवेल**




ओवेन्स कॉर्निंग कंपनीच्या सामाजिक बांधिलकी या उपक्रमांतर्गत दरवर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. याकरिता सर्व ओवेंन्स कॉर्निंग कंपनीचे सहकारी मोठ्या संख्येने आपले योगदान देत असतात. कंपनी सामाजिक उपक्रमांतर्गत प्राधान्याने शिक्षण, आरोग्य, सुरक्षा आणि पर्यावरण या क्षेत्रात कार्य करीत असते. तळोजा औद्योगिक क्षेत्रालगत असणाऱ्या जिल्हा परिषद विद्यार्थीनींसाठी क्रिडा स्पर्धा, शैक्षणिक मदत, गावातील महिला वर्ग व युवकांसाठी नोकरीच्या संधी उपलब्ध होण्यासाठी लागणारे तांत्रिक प्रशिक्षण देण्याचे विविध उपक्रम दरवर्षी सातत्याने राबवत असतात. यासाठी गावातील समस्त ग्रामस्थांकडून चांगला प्रतिसाद मिळत असतो.

हे उपक्रम राबविण्यासाठी ओवेंन्स कॉर्निंग कंपनी, युनायटेड वे ऑफ कंपनीच्या सहकार्याने कार्य करीत असते. कोविड काळामध्ये पण कंपनीने योग्य वेळी शासकीय नियमांना अनुसरुन सामाजिक उपक्रम सुरू ठेवले होते. ह्यावर्षी दि.२ व ३ डिसेंबर २०२२ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

यामध्ये कोहिनूर टेक्निकल सेंटरच्या सहयोगाने शिवणकाम / विणकाम प्रशिक्षण, महिला व युवकांना संगणक प्रशिक्षण, नजिकच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय शिष्यवृत्तीचे वाटप तसेच दान उत्सव या उपक्रमांतर्गत गरजू विद्यार्थ्यांसाठी शालेपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. याचबरोबर सत्यसाई संजीवनी चाईल्ड हार्ट केअर संस्थेसाठी देण्यात आलेल्या देणगीमधून ३९ मुलांना हृदयरोग शस्त्रक्रियेकरिता मदत होणार असल्याने एक चांगला उपक्रम हाती घेतल्याचे बोलले जात आहे.

सालाबादप्रमाणे यावर्षी सुद्धा ३ डिसेंबर रोजी परिसरातील सहा शाळांमधील सुमारे ३५० विद्यार्थ्यांसाठी खेळीयाड (आंतरशालेय क्रिडा स्पर्धा) चे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून शालेय विद्यार्थ्यांमध्ये शारिरीक व मानसिक कणखरता, सांघिक भावना रुजविण्याकरिता मदत होते. या बरोबरच कर्जत–खालापूर परिसरामध्ये जलसंवर्धन, पोषण व प्राथमिक वैद्यकीय सुविधा पुरविण्याचे कार्य सुरू करण्यात आले आहे.

या दोन दिवसा दरम्यान कंपनीचे ओसी फाऊंडेशन अध्यक्ष डॉन रेटींग व कंपनी एच आर डायरेक्टर संजय राव, ऑपरेशन डायरेक्टर आर.के.राव व कंपनीचे इतर प्रतिनिधी उपस्थित होते. या सर्व उपक्रमांना सर्व ग्रामस्थ आणि शिक्षक वर्ग यांचा सहयोग मिळत असतो. कंपनीच्या विविध कामांमुळे होणाऱ्या सामाजिक प्रबोधनामुळे कंपनी यापुढे देखील विविध उपक्रम करिण्याकरिता सदैव तत्पर असेल, असे आयोजकांकडून सांगितले आहे.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांस हे जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, माझे अशिल श्री.अतुल शिवाजीपुरी गोसावी यांनी आर्क ॲण्ड फ्युजन टेक्निकल सर्विसेस यांच्याकडून सदनिका क्रं.बी/५०२, साई अमृत सी.एच.एस.एल, प्लॉट नं.६४, सेक्टर नं.१७, रोडपाली, कळंबोली, नवी मुंबई–४१०२१८, ता.पनवेल, जि.रायगड येथे विकत घेतलेले आहे व सदर सदनिकेचा ओरिजिनल शेअर सर्टीफिकेट क्रं.४३ माझे अशिलांकडून दि.१३/१२/२०२१ रोजी दुपारी ३.०० पी.एम. हरवले आहे व त्यासाठी कळंबोली पोलीस स्टेशनमध्ये हरवलेल्या मालमत्तेचा नं.१४८०/२०२१ दि.१८/१२/२०२१ रोजी नोंदविला आहे.

तरी वरील सदनिकेवर व ओरिजनल शेअर सर्टीफिकेट क्रं.४३ बाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ह्या नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खालील पत्यावर दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास श्री.अतुल शिवाजीपुरी गोसावी यांना वरील मालमत्तेची मालक म्हणून डुप्लिकेट शेअर सर्टीफिकेट देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा चिार केला जाणार नाही.

**सही/–**
**मानस मोहंती**
**ॲडव्होकेट उच्च न्यायालय, बॉम्बे**
**ऑफिस नं.०८, राम हेरिटेज, प्लॉट नं.३२, सेक्टर नं.१२, कामोठे, नवी मुंबई–४१०२०९**
**मो.८१६९४७०८७३/९०२९४१८५०९**


पृष्ठ क्र.१ वरुन...

## ठाकरे गटाला पनवेलमध्ये धक्का ; रमेश गुडेकर बाळासाहेबांच्या शिवसेनेत

अनेकदा वादग्रस्त विधाने किंवा आपल्या शिवराळ भाषेमुळे गुडेकर चर्चेत असले तरी बाळासाहेब ठाकरेंपासून काम केलेले रायगड जिल्ह्यातील सर्वात जुने शिलेदार म्हणून त्यांची ओळख आहे. १९७१ पासून तब्बल पाच वेळा ते नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. शाखाप्रमुख– शहर प्रमुख पासून ते थेट वरिष्ठ जिल्हा सल्लागारापर्यंत शिवसेनेत त्यांना जबाबदाऱ्या देण्यात आल्या. खरे तर या आधीच 'मी बाळासाहेबांचा, मासाहेबांचा पण नाही मातोश्रीचा' असं म्हणत उद्धव ठाकरे यांच्या विरोधात असल्याचे काही महिन्यापूर्वीच त्यांनी स्पष्ट केले होते परंतु काल अधिकृतरित्या प्रथमेश सोमण यांच्या मध्यस्थीने वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत बाळासाहेबांच्या शिवसेनेत थेट प्रवेश करत शिंदे यांना जाहीर समर्थन दिले. रायगड किंवा पनवेल शिवसेनेमधील एक जुने नाव असल्याने गुडेकर यांच्या पक्षप्रवेशामुळे ठाकरे गटासाठी हा मोठा धक्का असल्याचे समजले जात आहे. यावेळी वर्षा निवासस्थानी प्रथमेश सोमण यांच्यासोबत पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनवणे संघटक अभिजीत साखरे उपशहर प्रमुख अर्जुन परदेशी प्रसिद्धी प्रमुख तोफिक बागवान इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते यापुढेही बाळासाहेबांच्या शिवसेनेचे रायगड जिल्हा सल्लागार म्हणूनच काम करण्याचे आदेश शिंदे यांनी दिल्या बाबत गुडेकर यांनी सांगितले. यावेळी पनवेलच्या विविध प्रश्नांसाठी पनवेल मध्ये येण्याचे निमंत्रण प्रथमेश सोमण यांनी महानगर प्रमुख म्हणून मुख्यमंत्री शिंदे यांना दिले.

## सुरेश कालगुडे खून प्रकरणी आरोपीला जन्मठेप

ॲड. म्हात्रे यांनी केलेला युक्तीवाद ग्राह्य मानून अतिरिक्त सत्र न्यायाधिश न्या. जहागिरदार यांनी आरोपी शिवपती पटेल याला सुरेश कालगुडे यांच्या खून प्रकरणी भा. दं.वि. कलम ३०२ अन्वये जन्मठेप आणि वीस हजार रुपये दंड, दंड न भरल्यास एक वर्ष सक्तमजुरी तर भारत कदम याला जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी १० वर्षांची सक्तमजुरी आणि पाच हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली.

## रात्रीच उभारलेल्या झोपड्या रात्रीच जमीनदोस्त

करून झोपड्या उभारणे व बेकायदा नागरी वस्ती निर्माण करून बेकायदा अतिक्रमण केले जात आहे. महापालिकेचे अतिक्रमण विभाग कळंबोली वसाहतीमध्ये अतिक्रमणवर कारवाई करून वसाहत सुंदर करण्याचा प्रयत्न करीत आहेत.मात्र भूमाफिया या महापालिकेच्या कारवाईला न जुमानता झोपड्या उभारण्याचं काम सुरूच ठेवत आहेत. कळंबोली जवळ रोडपाली तलावाच्या बाजूच्या महापालिकेच्या मोकळ्या झाल्यांवर दोन दिवसांपूर्वी रात्रीच झोपड्या सदृश्य बांबूंनी वेढलेल्या झोपड्या निर्माण करण्याचं काम केलं गेलं होतं .याची माहिती येथील सजग नागरिकांना मिळतात त्यांनी ताबडतोब याबाबतची माहिती कळंबोलीतील विभाग अधिकारी सदाशिव कवठे यांना दिली. त्यांनी याबाबतची गंभीर दखल घेऊन महापालिकेच्या अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांना रातोरात कारवाई करण्यास भाग पडून रातोरात उभारण्यात आलेल्या झोपड्या रात्रिच जमीन दोस्त केल्याने नागरिक महापालिकेच्या अतिक्रमण विभागाला धन्यवाद देत आहेत. अशाच प्रकारचे कारवाई नाल्याच्या बाजूला उभ्या करण्यात आलेल्या बेकायदा झोपडपट्टीवर करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.


## ग्रुप ग्रामपंचायत वडघर
### ता.पनवेल, जि.रायगड
### जाहीर नोटीस

महाराष्ट्र ग्रामपंचायत (अधिनियम १९५९) कलम १२९ तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फि नियम (शुल्क) १९६० चे अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने ग्रामपंचायत वडघरला प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत वडघर कडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ कलम १२९ नुसार कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| नं. | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांतन कर्त्यांचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | १३१७/१०१ | विठा पांडुरंग अपार्टमेंन्ट हाऊस नं.१३१७ रमाईनगर वडघर | आरसीसी पहिला मजला बांधकाम सदनिका क्रमांक–१३१७/१०१ एकूण–२४० चौ.मी. | अकबाल अहमद खतीर अली | मुकेश मनोज कुमार गुप्ता |
| २ | प्लॉट नं.२९१, गाळा नंबर–०४ | नामदेव रेसिडेन्सी प्लॉट नं.२९१ सेक्टर आर–३, पुष्पक वडघर | आरसीसी तळमजला बांधकाम गाळा क्र.०४ एकूण ९.७४६ चौ.मी. | मे.ओम साई इंटरप्रायझेसच्या तर्फे भागीदार जितेंद्र मुरलीधर करावकर | मुरलीधर नामदेव करावकर |
| ३ | प्लॉट नं.१२३ गाळा नं.०१ | प्लॉट नं.१२३, सेक्टर आर–१, पुष्पक वडघर | आरसीसी तळमजला बांधकाम गाळा क्र.०२ | चंद्रकांत विठ्ठल भोपी, कमलीबाई चंद्रकांत भोपी, राईट चंद्रकांत भोपी, व्हाईट चंद्रकांत भोपी | चंद्रकांत विठ्ठल भोपी, कमलीबाई चंद्रकांत भोपी, राईट चंद्रकांत भोपी, व्हाईट चंद्रकांत भोपी |
| ४ | घर नं.२२/२०२ | वडघर–मोहल्ला, पो. ता.पनवेल, | आरसीसी दुसरा मजला बांधकाम सदनिका क्र.२२/२०२ | काशिफ इकबाल दिवान रा. पटेल मोहल्ला पनवेल | मोहम्मद अमीर अब्दुल वारीस अन्सारी |
| ५ | घर नं.२२/३०२ | वडघर–मोहल्ला, पो. ता.पनवेल, | आरसीसी दुसरा मजला बांधकाम सदनिका क्र.२२/३०२ | काशिफ इकबाल दिवान रा. पटेल मोहल्ला पनवेल | मुस्ताक अहमद अन्सारी |
| ६ | घर नं.२२/४०३ | वडघर–मोहल्ला, पो. ता.पनवेल, | आरसीसी दुसरा मजला बांधकाम सदनिका क्र.२२/४०२ | काशिफ इकबाल दिवान रा. पटेल मोहल्ला पनवेल | मोहम्मद उमेर मोहम्मद बशीर |

**सही/–**
**(श्री.नंदकिशोर कृष्णा भगत)**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत वडघर**

**सही/–**
**(श्री.मुकेश नारायण कांबळे)**
**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत वडघर**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## वाकडी येथून १९ वर्षीय तरुणी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरात कोणाला काही न सांगता १९ वर्षीय तरुणी राहत्या घरातून निघून गेल्याने ती हरवली असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

वाकडी येथील साक्षी बाळू म्हात्रे तिचा रंग सावळा, केस काळे, उंची पाच फूट दोन इंच आहे. ती अंगाने सडपातळ असून अंगात गुलाबी रंगाचा पंजाबी ड्रेस, हाताला मेहंदी लावलेली आहे. गळ्यात पिवळ्या धातूची चेन घातली आहे. या तरुणीबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस हवालदार ए शिंदे यांच्याशी संपर्क साधावा.

## रायगडचा महेश कृष्णा पाटील आंतरराष्ट्रीय पदक विजेता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

न्यूझीलंड येथील ऑकलंड येथे सुरू असलेल्या कॉमनवेल्थ पॉवरलिफ्टींग स्पर्धेत भारतीय संघात रायगडचे पॉवरलिफ्टींग खेळाडू महेश कृष्णा पाटील (आपटी, खालापूर) यांची निवड झाली होती. या स्पर्धेत मास्टर (४०वर्षावरील) ५९ किलो वजनी गटात स्कॉट, बेंचप्रेस आणि डेड लिफ्ट या प्रकारात ३६० किलो वजन उचलून सुवर्णपदक प्राप्त केले आहे.

या कामगिरीबाबत महेश पाटील यांनी याचे श्रेय रायगड पॉवरलिफ्टींग संघटनेस दिले आहे. तसेच भारतीय संघात निवड झाल्यानंतर वेळोवळी महाराष्ट्र असोसिएशनचे सेक्रेटरी शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त संजय सरदेसाई यांनी केलेले बहुमोल मार्गदर्शन मोलाचे झाले असे बोलताना सागितले.

महेश पाटील यांचे पदक प्राप्तीबाबत रायगडचे अरुण पाटकर, गिरीष वेदक, सचिन भालेराव, राहुल गजरमल, संदीप पाटकर, माधव पंडित आणि यशवंत मोकल यांनी आनंद व्यक्त केला आहे. असे यश रायगडचे अनेक पॉवरलिफ्टीग खेळाडू पुढील काळात प्राप्त करतील अशी आशा व्यक्त केली आहे.

# माणगांवच्या अग्निशमन गाडीची पहिली कामगिरी प्रशिक्षीत दल नसतानाही कंपनीला लागलेली आग विझवली

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव नगर पंचायत मुख्याधिकारी संतोष माळी यांना निजामपूर येथिल जे.टी.एल बी.आर.डब्लु पाईप कंपनीतुन शुक्रवार दि.२ डिसेंबर दुपारी साडेतीनच्या सुमारास आग लागली असल्याचा कंपनी मॅनेजरचा फोन येताच, ही आग विझविण्याच्या कामी पहिल्यांदाच माणगांवच्या अग्निशमन दलात समाविष्ट झालेली शीघ्र प्रतिसाद गाडी आपला सायरन (भोंगा) वाजवीत शिघ्रतेने निजामपूरच्या दिशेने आपल्या ८ कर्मचाऱ्यांना घेऊन घटनास्थळी रवाना झाल्याची माहीती नगरपंचायत कर्मचाऱ्यांनी दिली. रोहा एमआयडीसी अग्निशमन दल त्यांचे अग्निशमन गाडीसह घटनास्थळी दाखल झाले व दोन्ही दलांनी एकत्रीत ही आग विझवली आहे.

या घटनेबाबत सविस्तर वृत्त असे की निजामपूर येथील जेटीएल पाईप कंपनी बाहेरील गवताने अचानक पेट घेतला व ही आग पसरत कंपनी बाहेरील मटेरियलने देखिल पेट घेतला. कंपनी बाहेरील पत्र्याची शेड जळु लागली. नगरपंचायत चे सिटी कॉर्डिनेटर




अतुल जाधव, कर्मचारी दशरथ गावडे, शशी मराठे, प्रकाश मोरे, अविनाश पाटील, महेंद्र मोरे, चंद्रकांत सोंडकर, महेंद्र मढवी, वैभव कोळी, बबन जाधव या आठ जणांच्या टीमसह माणगांव येथुन दहा मिनीटात घटनास्थळी पोहचुन प्रसंगावधान राखीत अग्निशमन गाडीच्या होज पाईप यंत्रणेचा वापर करीत पाण्याचा जोरदार फवारा मारुन अर्धा पाऊण तासात ही आग विजविण्यात यश मिळविले. यामुळे संभाव्य मोठी हानी टळली आहे. माणगांवच्या नवख्या कर्मचाऱ्यांना रोहा एमआयडिसी अग्निशमन दलाने फायर फायटींगची माहीती देत मदत केली आहे. आपल्या नगरपंचायतीस अग्निशमन फायर फायटींग ट्रेनिंगची नितांत गरज असुन आज अचानक लागलेल्या आग विझविण्याचे मदत कार्यात तत्परतेने कर्मचाऱ्यांनी नव्या यंत्रणेची माहीती नसतानाही चांगला वापर केला. भविष्यात मोठी आग दूर्घटना घडल्यास नगरपंचायत मुख्याधिकारी, नगराध्यक्ष आणि त्यांचे सर्व सहकारी तसेच विरोधी पक्षाचे सर्व सदस्यांनी आपल्या नगरपंचायत कर्मचाऱ्यांना देखिल अग्निशमन दृष्टीकोनातुन सुसज्ज प्रशिक्षण देण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. सुसज्ज यंत्रणा उपलब्ध आहे पण प्रशिक्षीत कर्मचारी ही आवश्यक आहेत. अन्यथा प्रसंगी ही यंत्रणा कुचकामी ठरु शकते.

# माथेरानमध्ये जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये आज नगरपालिकेकडून जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून नगरपालिका उत्पन्नातून राखीव ५ टक्के निधी माथेरानमध्ये दिव्यांग व्यक्तींसाठी वाटप करण्यात येतो त्याचे वाटप आज माथेरानचे मुख्याधिकारी सौ. सुरेखा भणगे शिंदे यांच्या हस्ते पालिकाचे स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे सभागृहामध्ये करण्यात आले. माथेरान मध्ये दिव्यांग व्यक्तींची संघटना असून या संघटनेचे अध्यक्ष श्री चंद्रकांत जाधव यांच्या नेतृत्वाखाली ही संघटना आपल्या अस्तित्वासाठी लढा देत असून त्यांच्या प्रयत्नातून आतापर्यंत ३३ जणांना अपंगत्वाचे सर्टिफिकेट मिळाले आहे व इतर सूविधानसाठी शासन दरबारी पाठपुरावा सुरू आहे.



त्याच प्रमाणे आज दुपारी येथील कम्युनिटी सेंटर येथे जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून चेंबूर येथील आमदार प्रकाश भाऊ फातर्पे कर तसेच स्वर्गीय मीनाक्षी तमिळ आमुदन यांच्या स्मरणार्थ माथेरान शहरातील दिव्यांग व्यक्तींसाठी दोन व्हीलचेअर, दोन वॉकर, पाच हँडस्टिक व दोन कोमोड स्टूल यांचे वाटप करण्यात आले. यावेळी दीव्यांग संघटना अध्यक्ष चंद्रकांत जाधव, भाजपा शहराध्यक्ष प्रवीण सकपाळ उपाध्यक्ष किरण चौधरी माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी प्रदीप घावरे, संदीप कदम, राजेश चौधरी, जनार्दन पारटे, सुभाष भोसले व भाजपाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# भाताण बोगद्याजवळ कार पेटली, सुदैवाने प्रवासी बचावले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

३ डिसेंबर रोजी संध्याकाळी पावणे पाच च्या सुमारास मुंबई पुणे लेनवर कि.मी.१३/६०० पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीत भाताण बो–गद्याजवळ एका कारला लागलेल्या आगीत कार जळून खाक झाली आहे. सुदैवाने या कारमधून प्रवासी खाली उतरल्याने ते बचावले आहेत.

क्रूज कार एम एच ४३ एजे ३१९२ वरील चालक हर्ष ईश्वरी प्रसाद कश्यप (वय २० वर्षे , रा. हिंजेवाडी फेज ३, पुणे) हा आपल्या ताब्यातील कार व त्यात दोन महिला तीन पुरुष असे मित्रमंडळीसह मुंबई ते पुणे एक्सप्रेस वे ने चालवीत घेऊन जात होता. यावेळी त्यांच्या ताब्यातील कारचे पुढील बोनट मधून धुर व आग येत असल्याचे जाणवल्याने चालकाने कार ताबडतोब रोडच्या साईडला रेलिंग जवळ थांबवून कार मधील मित्र मंडळीसह ते खाली उतरले.

काही वेळातच कार ने पेट घेतल्याने या ठिकाणांहून आयआरबी पेट्रोलिंग वाहन जात असताना त्यांनी ताबडतोब देवदूत फायर ब्रिगेडच्या साह्याने जळीत कारची आग विझ–वली. यात कार जळून खाक झाली.

यावेळी कार मधील प्रवासी यांना दुसऱ्या खाजगी कारने सुरक्षित ठिकाणी रवाना करुन आगीत पेटलेली अपघातग्रस्त वाहन आयआरबी



क्रेनच्या साह्याने रोडच्या शोल्डर लाईनला पलीकडे ठेवून, महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात आलीआहे. या ठिकाणी आयआरबी स्टाफ , आयआरबी रुग्णवाहिका स्टाफ सह, फायर ब्रिगेड मोबाईल स्टाफ, पळस्पे वाहतूक पोलीस हजर होते.

# घारापुरी ग्रामपंचायतीवर सेनेचा भगवा : उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे सरपंचासह आठही उमेदवार बिनविरोध

**दै.रायगड नगरी । उरण**

सरपंच बळीराम ठाकूर यांनी सेना व ग्रामपंचायतीच्या माध्यमातून केलेल्या विकासकामांच्या झंझावातापुढे भाजपचे स्थानिक नेते हतबल ठरल्याने निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठीही एकही उमेदवार सापडला नाही.त्यामुळे अत्यंत प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या घारापुरी ग्रामपंचायतीवर उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे सरपंचपदासह आठही उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.उरण तालुक्यातील १८ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत घारापुरी ग्रामपंचायतीवर सेनाचा भगवा निर्विवाद, बिनविरोध फडकल्याने उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.

ग्रामपंचायतीच्या निवडणुका जाहीर झाल्यापासूनच घारापुरी ग्रामपंचायतच्या निवडणुकीत उतरण्याची जोरदार तयारी भाजप आमदार महेश बालदी, माजी सरपंच राजेंद्र पडते यांच्या नेतृत्वाखाली समर्थकांनी केली होती.निवडूकीच्या पार्श्वभूमीवर पुस्तिकाही प्रसिद्ध केली होती.उमेदवारांची चाचपणीही करुन निवडणुकीत उतरण्याची जोरदार तयारी केली होती.



मात्र कोरोनाची दोन वर्षं वगळता तीन वर्षांत सरपंच बळीराम ठाकूर यांनी सेना व ग्रामपंचायतीच्या माध्यमातून केलेल्या गावाच्या विकासकामांपुढे भाजपचे स्थानिक नेते हतबल ठरले.सेना उमेदवारांपुढे निभाव लागणार नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर भाजपचा एकही उमेदवार शेवटच्या दिवसापर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी पुढे आला नाही.

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या विरोधात भाजप गटाकडून शेवटच्या दिवसापर्यंत एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नाही.त्यामुळे मात्र घारापुरी ग्रामपंचायतीवर उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आठही उमेदवार बिनविरोध निवड झाल्याची घोषणा होण्याची औपचारिकताच उरली आहे.दरम्यान आठही सदस्यांनी जिल्हा प्रमुख मनोहर भोईर यांची भेट घेऊन जल्लोष केला.या बिनविरोध निवडणूकीमुळे भाजप आमदार महेश बालदी यांना धक्का बसला आहे.

थेट सरपंच सौ.मीना मुकेश भोईर,प्रभाग क्रमांक १ मधुन बळीराम पद्माकर ठाकुर,सौ.हेमाली रुपेश म्हात्रे, सौ.अरुणा कमलाकर घरत,प्रभाग क्रमांक २ मधुन भरत शंकर पाटील,सौ.नीता दिनेश ठाकुर तर प्रभाग क्रमांक ३ मधुन सचिन मुकुंद लाड,सौ.भारती प्रमोद पांचाळ हे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.

## वन रुपीज क्लीनिकमध्ये चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वेस्थानकातील एका औषधांच्या दुकानात चोरीची घटना घडली आहे. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पनवेल रेल्वेस्थानकातील वन रुपीज या औषधाच्या दुकानात चोरीची घटना घडली आहे. दुकानाच्या मागील भागातील ग्रील तोडून अज्ञा–ताने आत प्रवेश केल्याचे उघड झाले.

यामध्ये दोन मोबाइल व रोख रक्कम चोरीला गेली आहे. याप्रकरणी पनवेल रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

मे.सकपाळ मॅडम यांचे कोर्टात

अर्जदाराचे वकील
ॲड.विकास अशोक बडे

### जाहिर नोटीस

खालापूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज नं.३२६/२०२२

श्री.नवज्योत कमलेश कुमार धार
वय : ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.ए २०१, नील सृष्टी, प्लॉट नं.१९, २०, २१,
श्रीराम चिट फंड, सेक्टर ४, न्यू पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६ — अर्जदार

विरुद्ध

मा.ग्रामविकास अधिकारी सो
ग्रुप ग्रामपंचायत वासांबे, मोहोपाडा,
ता.खालापूर, जि.रायगड — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी श्री.नवज्योत कमलेश कुमार धार हे अर्जदार असून त्यांचा जन्म दि.०२/०५/१९८५ रोजी एच.आय.एल. कॉलनी, चांभार्ली, मोहोपाडा, ता.खालापूर, जि.रायगड येथे झाला आहे. अर्जदार यांनी जन्म–मृत्यू नोंद कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माची नोंद करून मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

सदरकामी कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.न्यायालयात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे.न्यायालय वरील अर्जदार यांचे अर्जाकामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील व अर्जदार यांना जन्म–मृत्यू नोंद कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये श्री.नवज्योत कमलेश कुमार धार यांच्या जन्माची उशिरा नोंद करून मिळणेबाबत दाखल केलेला अर्ज मंजूर करील.

आज दि.२३/११/२०२२ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, खालापूर**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, खालापूर**

---

श्री.एन.आर.इंदलकर साहेब यांचे न्यायालयात

अर्जदारतर्फे वकील
ॲड.अविनाश केसकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
फौ.एम.ए.क्र.११८/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१२/०१/२०२३

श्री.दत्तात्रय कृष्णा लोखंडे — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

सदर जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, सदर अर्जदार दत्तात्रय कृष्णा लोखंडे यांची मुलगी कु.अनामिका दत्तात्रय लोखंडे हिचा जन्म दि.२७/०४/१९९१ रोजी मॅटीनिटी हॉस्पिटल कळंबोली, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेला आहे. अर्जदारांकडून त्यांच्या मुलीची जन्माची नोंद, पनवेल महानगरपालिका, कळंबोली विभाग दप्तरी नोंदणी अभिलेखात नोंद करण्याचे अनावधनाने राहून गेलेले आहे. सबब जन्म–मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदारांच्या मुलीच्या जन्माची नोंद होण्यासंबंधी पनवेल महानगरपालिका, कळंबोली विभाग, ता.पनवेल, जि.रायगड यांस योग्य ते आदेश पारित करण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदर अर्जास कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयाकडे ३० दिवसांच्या मुदतीच्या आत सादर कराव्यात. विहित मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मा.न्यायालय अर्जदार यांच्या मुलीच्या जन्माची नोंद होण्यासंबंधी पनवेल महानगरपालिका, कळंबोली विभाग यांस योग्य ते आदेश पारित करतील याची नोंद सर्वांनी घ्यावी.

आज दि.३/१२/२०२२ रोजी आमचे सहीने ना.न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

**सही/–**
**क.लिपीक**
**फौ.न्याया, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्याया, पनवेल**

---

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, मौजे : वलप, ता.पनवेल, जि.रायगड येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्कांची, ताबेकब्जातील मिळकत / जमीन आमचे अशिलांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : वलप, ता.पनवेल, जि.रायगड**

| गाव | भोगवटादारांची नावे | गट क्रं. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|---|---|
| वलप | धनाजी लक्ष्मण पाटील व इतर | १११ | ०–१५–१० पो.ख.०–०१–५० एकूण ०–१७–४० | १.९४ |

सदरहू जागा, जमीन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे इजमेंट, कुळ वहिवाटीचा हक्क, दावे, फरोक्त, साठेकरार, वचनपावती, वारसाहक्क, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, लीन, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार–मदार, मालकी हक्क, जाणे येणेच्या रस्त्याचा हक्क वा अन्य कोणत्याही हक्काने काही हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा व संबंधितांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती / तक्रारी आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०३/१२/२०२२

**सही/–**
**ॲड.अर्चना म्हस्कर**
**शिवकृपा अपार्टमेंट, प्लॉट नं.२५,**
**बँक ऑफ इंडिया जवळ, सेक्टर १२,**
**कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**
**नवी मुंबई ४१०२०९**
**मो.नं.९९२०७७७९७९**

---

श्री.किरापते साहेब

अर्जदाराचे वकील
ॲड.श्री.एम.एम.मोकल

### जाहिर नोटीस

उरण येथील मे.सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात
दिवाणी चौकशी अर्ज क्र.१९०/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०४/०२/२०२३

महंमद उर्फ मोहमद अत्ताउल्लाह महंमद उर्फ मोहमद हसन तुंगेकर (मयत) तर्फे वारस
महंमद उर्फ मोहमद हसन महंमद उर्फ मोहमद अत्ताउल्लाह तुंगेकर
वय : ६० वर्षे, धंदा : ड्रायव्हर
रा.उरण म्यु. घर नं.३६४, हसन मंजिल,
पोलीस स्टेशन रोड, उरण, ता.उरण, जि.रायगड — अर्जदार

ज्याअर्थी महंमद उर्फ मोहमद अत्ताउल्लाह महंमद उर्फ मोहमद हसन तुंगेकर हे दि.२२/०४/२०२१ रोजी त्यांचे राहते घरी मयत झाले. महंमद उर्फ मोहमद अत्ताउल्लाह महंमद उर्फ मोहमद हसन तुंगेकर यांस महंमद उर्फ मोहमद हसन अत्ताउल्लाह तुंगेकर हेच कायदेशीर वारस आहेत. याशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदार याने वक्फ बोर्ड औरंगाबाद यांचेकडे मयत ट्रस्टी महंमद उर्फ मोहमद अत्ताउल्लाह महंमद उर्फ मोहमद हसन तुंगेकर यांचे जागी वारसा हक्काने हजरत पीर साहेब दर्गा पाखाडी, नागाव व जामे मस्जिद उरण या संस्थेचे ट्रस्टी नेमणुककरिता अर्ज दिलेला आहे. सदर फेरबदल अर्जाचे कामी वक्फ बोर्ड औरंगाबाद चेअरमन यांनी दि.१५/०९/२०२२ रोजी दिलेल्या पत्रानुसार अर्जदार याने मयत महंमद उर्फ मोहमद अत्ताउल्लाह महंमद उर्फ मोहमद हसन तुंगेकर यांचे महंमद उर्फ मोहमद हसन अत्ताउल्लाह तुंगेकर हेच कायदेशीर वारस ठरवून तसा सर्टीफिकेट मिळावे असा कोर्टाकडे अर्ज दाखल केला आहे. सोबत अर्जाची प्रत जोडली आहे.

त्याअर्थी अर्जदार याचे वडील महंमद उर्फ मोहमद अत्ताउल्लाह महंमद उर्फ मोहमद हसन तुंगेकर यांना वर नमूद केलेले अर्जदार व्यतिरिक्त कोणी वारस असलेबाबत हरकती असल्यास त्या त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत मे.कोर्टात सादर करावी. अन्यथा मुदतीनंतर अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल हे कळावे.

उरण
दि.०२/१२/२०२२

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

---

मा.सोनावणे सो

प्रोसेस जमा रु.५०/– वकील : श्री.ए.टी.चौधरी

### जाहिर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पनवेल यांचे न्यायालयात
चौकशी अर्ज क्र.१२५५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१७/०१/२०२३

१) श्रीमती.संगीता नामदेव ठाकूर
वय : वर्षे, व्यवसाय : शेती / गृहिणी
२) कु.मनाली नामदेव ठाकूर
वय : २३ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३) श्री.रोहन नामदेव ठाकूर
वय : १९ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
४) कु.कनिष्का नामदेव ठाकूर
वय : १५ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
५) कु.कार्तिक नामदेव ठाकूर
वय : १२ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
सर्व रा.मु.कोपरा, पो.ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

वरील अर्जदार यांचे वडील कै.नामदेव तुळशीराम ठाकूर हे दि.१२/०६/२०२० रोजी मयत झाले. नामदेव तुळशीराम ठाकूर यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**

१) मौजे से.८ खारघर प्लॉट नं.१२ अ श्री.शांतीनिकेत अ विंग रुम नं.५०१, खारघर

२) मौजे : धारणा कंप शिर्के निवास तळमजला, घर नं.१२१, ता.पनवेल, जि.रायगड

३) से.१०, घर नं.७३१, खारघर नवी मुंबई येथे आहे.

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील अर्जदारांच्या वारसाच्या दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत ह्या न्यायालयात दाखल करावी.

वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंतीप्रमाणे वारसांचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.३/१२/२०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**मे.प्र.न्याय., पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**मे.प्र.न्याय., पनवेल**

# संक्षिप्त...

## दुकानदारास मारहाण करून महागड्या मोबाइलसह रोख रकमेची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तळोजा गाव येथील एका मोबाईल गॅलरीत काम करणाऱ्या एका इसमास मारहाण व शिवीगाळ करून दुकानातील मोबाइल व रोखरक्कम जबरीने चोरी केल्याची घटना घडली आहे.

शफी पटेल (वय ४३) यांच्या अराफत मोबाईल गॅलरीमध्ये मुनाफ मुल्ला हा इसम येऊन त्याने त्याला मारहाण व शिवीगाळ करून दुकानातील महागडे मोबाईलफोन व रोख रक्कम असा मिळून २३ हजार ८१५ रुपये किमतीचा ऐवज जबरीने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## रस्त्यावर बेकायदेशीरपणे खाद्य पदार्थांची विक्री करणाऱ्यावर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बेकायदा फुटपाथवर टेबल ठेवून वाहतुकीस अडथळा निर्माण करून गॅस सिलेंडरच्या साहाय्याने शेगडी पेटवून अंडाभुर्जी विक्री करणाऱ्याविरोधात पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे. शहरातील एस.टी.स्टॅन्ड समोरील फुटपाथवर मधुकर जोशी या इसमाने टेबल ठेवून टेबलवर मानवी जीवितास धोकादायक ठरेल अश्या रीतीने रहदारीस अडथळा निर्माण करून गॅस सिलेंडरच्या साहाय्याने शेगडी पेटवून अंडाभुर्जी विक्री करत असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळताच पोलीस निरीक्षक (प्रशासन) यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश दळवी व त्यांच्या पथकाने सदर ठिकाणावरून सिलेंडर, लोखंडी शेगडी व इतर ऐवज असा मिळून सातशे रुपयांचा ऐवज हस्तगत केला आहे. तर अशाचप्रकारे सुनीलकुमार भारती (वय ४५) याच्या वडापावच्या व्यवसायावर कारवाई करून त्याच्याकडून स्टीलची शेगडी, सिलेंडर व इतर ऐवज मिळून ८०० रुपयाचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.



### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# गोवर आणि डेंग्यूच्या साथीत खोपोली शहरात घाणीचे साम्राज्य

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली नगर परिषदेच्या लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ डिसेंबर २०२१ पासून संपला आहे. तेव्हापासून प्रशासक म्हणून खोपोली नगर परिषदेचा युवा, धडाकेबाज, कार्यतत्पर मुख्याधिकारी अनुप तुरे कार्यभार सांभाळत आहे. मात्र, गेल्या एका वर्षात खोपोली शहराचा अक्षरश: खेळखंडोबा झाला आहे. स्वच्छता असो की, मुलभूत गरजा... ऐवढेच नव्हे तर आवश्यक सुविधांचा बोजवारा उडाला आहे. मागील आठवडाभर पाण्यासाठी खोपोलीकर वणवण करताना दिसले. बारमाही वाहणारी पाताळगंगा नदी उशाशी असताना सुध्दा दुष्काळसदृश्य परिस्थितीचा सामना खोपोलीची जनता करताना दिसली.



खोपोली नगर परिषद प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळेच खोपोलीकरांसह मुंबई, पुण्याला जाणाऱ्या वाहन चालकांना शिळफाटा येथे दररोज वाहतूक कोडीचा सामना करावा लागत आहे. कधीकाळी आशियातील नंबर वन नगरपरिषदेचा बहुमान मिळविणाऱ्या खोपोली नगरपरिषदेने दिल्लीत स्वच्छ शहरासाठी अनेक पुरस्कार मिळविले आहेत. कोट्यावधी रुपयांचा निधी 'स्वच्छ भारत' अभियानांतर्गत खोपोली नगर परिषदेला मिळाला आहे. परंतु कोट्यवधीचा निधी मिळविणारी खोपोली नगर परिषद फक्त पुरस्कारापुरतीच कागदोपत्री स्वच्छ झाल्याचे दिसून येत आहे.

राजकीय वादातून शहरांचा विकास होत नाही, अशी ओरड देशभरात केली जात आहे. त्यामुळे प्रशासकाच्या हातात सत्ता गेल्यास शहराचा विकास वेगाने होईल, अशी खोपोलीकरांना अपेक्षा होती. परंतु खोपोली जनतेचा स्वप्नभंग झाला असून कधी एकदा निवडणूक होते आणि कधी एकदा कार्यसम्राट युवा नेते खोपोली कारभाराचा गाडा हातात घेतात, याची उत्सुकता लागून राहिली आहे.

स्वच्छ सुंदर खोपोली शहराचा तोरा मिरविणाऱ्या खोपोलीत जागोजागी कचऱ्यांचे ढीग साचले असल्याचे दिसून येत आहे. राज्यासह देशात सध्या गोवर आणि डेंग्यूच्या साथींनी धुमाकूळ घातला असताना खोपोली शहरातील जनता विद्यालय, जुनी खोपोली नगर परिषद इमारत, सुभाषनगरसह जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गालगत अस्वच्छतेचे भयावह चित्र दिसून येत आहे आणि एकीकडे तुकाराम मुंडे सारख्या अधिकाऱ्याने राज्यातील जनतेला भुरळ पाडली आहे. ऐवढेच नव्हे खालापूर तहसीलदार अय्युब तांबोळी, खोपोली शहर पोलीस निरीक्षक शिरीष पवार, खालापूर पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, कर्जत प्रातांधिकारी अजित नैराळे यांच्या कार्य तत्परतेची देखील जनता मुरीद झाली असताना फक्त खोपोली नगर परिषदेचा तेवढा बोजवारा उडाला असल्याचे दिसून येत आहे.

# कर्जत तालुक्यातील सात ग्रामपंचायतीच्या निवडणुका १८ डिसेंबर रोजी

**दै.रायगड नगरी । कर्जत**

माहे ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ मध्ये मुदत संपणारा ग्रामपंचायती मध्ये कर्जत तालुक्यातील मांडवणे, कळंब, उक्रूळ, दहिवली तर्फे वरेडी, वावळोली,कोंदिवडे आणि वेणगाव या सात ग्रामपंचायतीच्या निवडणुका १८ डिसेंबर रोजी जाहीर झाल्या आहेत.

२८ नोव्हेंबर २०२२ ते २ डिसेंबर २०२२ रोजी पर्यंत नामनिर्देशन पत्र भरण्याची मुदत होती, मांडवणे ग्रामपंचायत मध्ये सरपंच पदासाठी ६ नामनिर्देशन पत्र तर ७ सदस्यांसाठी २७ नामनिर्देशन पत्र दाखल झाली आहेत, कळंब ग्रामपंचायत मध्ये सरपंचपदासाठी ५ नामनिर्देशन पत्र तर १३ सदस्यांसाठी ४९ नामनिर्देशन पत्र दाखल झाली आहेत, उक्रुळ ग्रामपंचायत मध्ये सरपंच पदासाठी ५ नामनिर्देशन पत्र तर ९ सदस्यांसाठी २५ नामनिर्देशन पत्र दाखल झाली आहेत, दहीवली तर्फे वरेडी ग्रामपंचायत मध्ये सरपंच पदासाठी ६ नामनिर्देशन पत्र तर ११ सदस्यांसाठी ३४ नामनिर्देशन पत्र दाखल झाली आ-हेत, वावळोली ग्रामपंचायत मध्ये सरपंच पदासाठी ७ नामनिर्देशन पत्र तर ९ सदस्यांसाठी १७ नामनिर्देशन पत्र दाखल झाली आहेत, कोदींवडे ग्रामपंचायत मध्ये सरपंच पदासाठी ६ नामनिर्देशन पत्र तर ९ सदस्यांसाठी ३६ नामनिर्देशन पत्र दाखल झाली आहेत, आणि वेणगाव ग्रामपंचायत मध्ये सरपंच पदासाठी ६ नामनिर्देशन पत्र तर ११ सदस्यांसाठी ५६ नामनिर्दे शन पत्र दाखल झाली आहेत. सध्या ७ ग्रामपंचायतीच्या ७ सरपंच पदासाठी ४१ नामनिर्देशन पत्र तर ७ ग्रामपंचायतीच्या ६९ सदस्यांसाठी २४४ नामनिर्देशन पत्र दाखल झाली आहेत

दि. ५ डिसेंबर रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी होणार आहे, तर दि.७ डिसेंबर रोजी नामनिर्देशन पत्र मागे घेण्याची अंतिम दिनांक आहे त्यानंतर निवडणुकीचे खरे चित्र समोर येईल.

# पेण-खोपोली महामार्ग रुंदीकरण नुकसानीचे संयुक्त सर्वेक्षण होणार

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण - खोपोली रोड राष्ट्रीय महामार्गाचे रुंदीकरण करताना बाधित झालेल्या पेण तालुक्यातील कामार्ली येथील कुटुंबांकडून मोबदला मिळावा म्हणून मागणी होत आहे. त्यामुळे रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर संयुक्तपणे कामार्ली येथील नुकसानीचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत.

सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षते खाली आज पेण - खोपोली रोड राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणातील बाधितांना मोबदला देण्याच्या विषयावर चर्चा करण्यासाठी बैठक पार पडली. अलिबागचे आमदार महेंद्र दळवी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, रायगडचे जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांचेसह कामार्ली येथील ग्रामस्थ व प्रतिनिधी सदर बैठकीला उपस्थित होते.

पेण-खोपोली रोड राष्ट्रीय महामार्गाचे १८ मीटरचे रुंदीकरण करताना १५ स्थानिक ग्रामस्थांची घरे, दुकाने बाधित होत आहेत. त्याशिवाय ३० मीटरचे रूंदीकरण केल्यास बाधित होणाऱ्या घरांची संख्या १०० च्या आसपास जाते. केंद्र शासनाच्या नियमांनुसार जर अतिक्रमण काढताना कुणीही बेघर होत असल्यास त्याला नुकसान भरपाई देण्याची तरतूद आहे. कामार्ली



येथून जाणाऱ्या महामार्गाच्या रुंदीकरणामुळे ज्यांची घरे, दुकानांचे नुकसान झाले आहे, अशा सर्वांचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत.

# पिंगळसई येथे श्री.दत्त जयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहे तालुक्यातील पिंगळसई येथे बुध. दि.७ डिसेंबर ते रविवार दि.११ डिसेंबर या कालावधीत संपन्न होणाऱ्या श्री.दत्त जयंतीनिमित्त सोहळ्यानिमित्त विविध प्रकारचे धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे.

स्वा.सु.गुरूवर्य अलिबागकर महाराज,गोपाळबाबा वाजे व धोंडू बाबा कोलाटकर यांचे कृपाछत्राखाली व ह.भ.प.गुरूवर्य नारायण दादा वाजे(मठाधिपती पंढरपूर),ह.भ.प.गुरूवर्य पुरूषोत्तम महाराज पाटील, ह.भ.प.गुरूवर्य सखाराम महाराज निकम यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली संपन्न होणाऱ्या या सोहळ्याप्रसंगी बुध.दि.७ डिसेंबर सायं..४ ते ६ ह.भ.प.गुरूवर्य पुरूषोत्तम महाराज पाटील यांची हरिकिर्तनरूपी सेवा संपन्न होणार असून गुरू.दि.८ डिसेंबर रात्रौ.९ ते ११ किर्तनसेवा ह.भ.प.भारतीताई गाडेकर,वैजापूर, शुक्रवार दि.९ डिसेंबर रात्रौ.९ ते ११ किर्तनसेव ह.भ.प.डॉ.प्रविण पाटील वैजापूर, शनिवार दि.१० डिसेंबर रात्रौ.९ ते ११ किर्तनसेवा ह.भ.प.बालकिर्तनकार चैतन्य महाराज राऊत बीड तर रविवार दि.११ डिसेंबर रोजी रात्रौ.९ ते ११ या वेळेत किर्तनसेवा ह.भ.प.अनिल महाराज तुपे यांची होणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. या संपूर्ण सोहळ्यात विविध प्रकारचे धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार असून या सोहळ्याचे यशस्वीतेसाठी ग्रामस्थ व महिला मंडळ पिंगळसई(दत्तआळी) व जाणता राजा मित्र मंडळ पिंगळसई अधिक मोलाचे सहकार्य करीत आहेत.

# उलवे नोड वासियांना अखेर १७ वर्षांनी मिळणार हक्काची स्मशानभूमी

## काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या पाठपुराव्याला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सिडको विकसित करत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे प्रवेशद्वार असलेल्या उलवे नोड रहीवासियांना मागील १४ ते १५ वर्षांपासून स्मशानभूमी तसेच दफनभूमीची व्यवस्था सिडकोकडून करण्यात आली नव्हती. रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष तथा कामगार नेते महेंद्र घरत यांनी यासाठी सिडको प्रशासन तसेच सिडको व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्याबरोबर सातत्याने चर्चा व पाठपुरावा करून अखेर सिडकोकडून



सेक्टर १४ मध्ये अडीच हेक्टरचा भूखंड स्मशानभूमी व दफनभूमीसाठी मंजूर करण्यात यश मिळवले. जवळ जवळ दिड कोटी रुपये खर्चाच्या स्मशानभूमीच्या कामाला सुरवात झालेली आहे. त्यामुळे उलवे नोड रहीवासियांची स्मशानभूमी व दफनभूमीची समस्या महेंद्र घरत यांच्यामुळे मार्गी लागली आहे.

या अगोदरसुद्धा नेरूळ येथील आगरी कोळी भवनाच्या धर्तीवर उलवेमध्ये भवन व्हावे यासाठी नामदेव भगत हे सिडकोचे संचालक असतांना कामगार नेते महेंद्र घरत यांनी सततच्या पाठपुराव्याने उलवे नोड येथे भुमीपुत्र भवन उभारण्यात आले. भुमीपुत्र भवन उभारण्यात महेंद्र घरत यांचा सिंहाचा वाटा आहे. प्रकल्पग्रस्तांचे नेते स्वर्गीय दि. बा. पाटील साहेब यांच्या नंतर प्रकल्पग्रस्तांसाठी लढणारे, प्रकल्पग्रस्त गावांसाठी सिडकोकडून विविध योजना राबविणारे एकमेव नेते हे महेंद्र घरत आहेत.

# पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीच्या अध्यक्षपदी निलेश सोनावणे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पत्रकार संघर्ष समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा पनवेल शासकीय विश्रामगृहात नुकतीच पार पडली. यावेळी सन २०२३ करिता नवीन कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

अध्यक्षपदी निलेश सोनावणे यांची पाचव्यांदा सर्वानुमते निवड करण्यात आली. तर कार्याध्यक्षपदी संजय कदम, सचिव पदी संतोष सुतार, सहसचिवपदी अनिल कुरघोडे, उपाध्यक्षपदी आनंद पवार व रवींद्र गायकवाड तर खजिनदारपदी हरेश साठे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तर मार्गदर्शक म्हणून सल्लागारपदाची जबाबदारी ज्येष्ठ पत्रकार सुनिल पोतदार आणि दिपक महाडिक यांच्यावर सोपविण्यात आली. यावेळी नवनिर्वाचित कार्यकारिणीचे अभिनंदन करून पुढील वाटचालकरीता शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी संतोष भगत, अनिल भोळे,



भरतकुमार कांबळे, गणपत वारगडा आदी कार्यकारणी सदस्य उपस्थित होते.

यावेळी निलेश सोनावणे यांनी पुन्हा एकदा आपल्यावर विश्वास दाखवल्याबद्दल सर्वांचे आभार मानले व नवीन वर्षात नाविन्यपूर्ण उपक्रम सर्वांच्या सहकार्याने राबविण्यात येतील तसेच लवकरच पुढील वर्षांच्या कार्यक्रमांची रुपरेषा ठरविण्यात येईल असे यावेळी नमूद करून जास्तीत जास्त समाजोपयोगी उपक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले.

# नवीन मतदार नोंदणीत तळा तहसीलची वाड्या वस्तीवर जोरदार मोहीम

**दै.रायगड नगरी । तळा**

मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी रायगड व मा.उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणुक अधिकारी यांचे आदेशाने भारत निवडणूक आयोग यांचे संक्षीप्त पुनर्रक्षण कार्यक्रमांतर्गत ९/१२/२०२२ पर्यंत आदेश देण्यात आले असून याची अंमलबजावणी १९३ श्रीवर्धन मतदारसंघ उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन अमित शेडगे व तहसीलदार तथा सहाय्यक मतदान नोंदणी अधिकारी अण्णाप्पा महादेव कनशेट्टी यांचे मार्गदर्शनाखाली २९/११/२०२२ रोजी गो.म.वेदक विद्यामंदिर व कनिष्ठ महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी कॅम्प घेऊन जनजागृती व मार्गदर्शन मतदान अधिकारी तहसिलदार मंगेश पालांडे महेंद्र कजबजे यांनी केले तसेच नगरपंचायत तळा येथे दिव्यांग मतदार साठी घेऊन नवीन नोंदणी करण्यात आली.

यावेळी संघटना अध्यक्ष तथा पत्रकार किशोर पितळे उपस्थित होते. मेढा आदिवासी वाडी अंबेळी आदिवासी वाडी तसेच येथे करण्यात आले. यावेळी निवडणूकमहसूल सहाय्यक भूषण विश्वासराव पाटील नगरपंचायत लेखनिक दीपक वडके किरण नागावकर, प्रसाद सुतार तळा तलाठी प्रविण गवई व मालूसरे तलाठी उपस्थित होते. मा.तहसिलदार तळा यांच्या सूचनेनुसार आज दिनांक ३/१२/२०२२ रोजी आदिवासी समाजाच्या मतदार बांधवाना यांचे साठी आंबेली आदिवासीवाडी येथे विशेष मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सदर शिबिरासाठी निवडणूक महसूल साहाय्य भुषण पाटील, तलाठी प्रविण गवई तळा, नगरपंचायत लिपिक दिपक वडके उपस्थित होते.

सदर शिबिरात नमुना नं. ६ चे एकूण १८ अर्ज भरुन घेण्यात आले. तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवक, शिक्षक यांच्या मदतीने १८ वर्षावरील नवीन मतदार नोंदणी करून घेण्याचे आदेश देण्यांत आले असून अधिकाधिक मतदार संख्या वाढण्याचा प्रयत्न करीत असून वंचीत रहाणार नाही याची दखल घेत असून पुढील आठवड्यात अशा अनेक उपक्रमांतर्गत तालुक्यातील नवीन मतदारांची नोंदणी करण्यासाठी नियोजन सुरू असल्याचे माहिती तहसीलदार तथा सहाय्यक मतदान नोंदणी अधिकारी अण्णाप्पा कनशेट्टी यांनी दिली.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

### (हक्कसोड पत्राबाबत)

संचिका क्र. २५५, कामोठे-२ मध्ये मौजे टेंभोडे, निवाडा क्र. ६४, सर्व्हे क्र./हिस्सा क्र. ७५/५ब, क्षेत्र ०-२१-० हे.आर. संपादित जमिनीन्वये २०० चौ.मी. भूधारक अनंता धर्मा पाटील व इतर यांच्या नावे पात्रता मंजूर करण्यात आली आहे.

वरील संपादित जमिनीन्वये मंजुर २०० चौ.मी. पात्रतेन्वये दि. १९/०२/२०२२ रोजीच्या संगणकीय सोडतीमध्ये अनंता धर्मा पाटील व इतर यांना मौजे कामोठे, सेक्टर १०, भूखंड क्र. ६०B/१, क्षेत्र २०० चौ.मी. चे भूखंड इरादित करण्यात आले आहे.

सदर वरील नमुद संपादित जमिनीकरिता श्री. कृष्णा धर्मा पाटील व इतर यांनी श्री. अनंता धर्मा पाटील यांचे लाभात सह-दुय्यम निबंधक पनवेल-३ यांच्याकडे नोंदणीकृत हक्कसोड पत्र क्र. ७५५२/२०१० सादर केले आहे.

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तींची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तींची नावे |
|---|---|
| १. श्री. कृष्णा धर्मा पाटील<br>२. श्रीमती राजूबाई कुत्या कोपरकर<br>३. श्रीमती मंजी ऊर्फ गंगुबाई शांताराम पाटील<br>४. श्रीमती कमला ऊर्फ सुनंदा कृष्णा शेलटकर | १. श्री. अनंता धर्मा पाटील<br>२. श्री. गणू धर्मा पाटील |

उपरोक्त दाव्यातील (हक्कसोड) नुसार सिडकोकडून केवळ खालील व्यक्तीच उपरोक्त संपादित जमिनीकरिता इरादित भूखंडाचे वाटप स्विकारुन करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरु शकतात.

| हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तींची नावे |
|---|
| १. श्री. अनंता धर्मा पाटील |
| २. श्री. गणू धर्मा पाटील |

उपरोक्त हक्कसोडपत्र विचारात घेऊन ज्यांनी इरादित भूखंडामधील हक्क व हितसंबंध सोडून दिलेले आहेत. त्यांची नावे वगळून ज्यांना जे हक्क प्रदान करण्यात आलेले आहेत, अशा व्यक्तींच्या नावे सिडकोकडून भूखंडाचे वाटप व आवश्यक तो करारनामा करुन भूखंडाचा ताबा आजच्या तारखेपासून ३० दिवसांत कोणत्याही दिवशी देण्याचे प्रस्तावित आहे.

वरील इरादित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे साडेबारा टक्के योजने संदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत/तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत/तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायालयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करुन सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, ७ वा मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई** यांच्या कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून ३० (तीस) दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमूद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजनेंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/३५४/२०२२-२३